# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

नवीन विषय/तुकडी/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा करिता

## जाहीर प्रगटन

**(शासन निर्णय क्र एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि–४, दि. १३/०९/२०१७ अन्वये वृत्तपत्रातील संक्षिप्त जाहिर प्रगटनाचा सविस्तर तपशील)**

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड हे शैक्षणिक वर्ष **२०२५–२६** करिता विद्यापीठ कार्यक्षेत्रातील (नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर जिल्हा) संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/ तुकडी/अभ्यासपाठयक्रम/ विद्याशाखा इत्यादी सुरु करण्यासाठी संबंधीत संस्था/महाविद्यालयांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहे. सादर करावयाचे विहीत नमुन्यातील प्रस्ताव/आवेदनपत्र, शासन निर्णय परिशिष्टांसह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.srtmun.ac.in यावर News / Circulars - Academic मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे.

संस्था/महाविद्यालयांनी आवेदनपत्र/प्रस्ताव, सादर करतांना शासन निर्णयात नमुद परिशिष्ट 'अ' मध्ये विहीत केल्याप्रमाणे, विहीत शुल्कासह परिशिष्ट 'ब' नुसार आवेदनपत्र/प्रस्तावा सोबत आवश्यक सर्व कागदपत्रे क्रमाने जोडुन विद्यापीठात सादर करण्याची अंतीम तारीख **दि. ३०/०९/२०२४** ही आहे. सर्व संबंधितास आवेदनपत्र / प्रस्ताव शनिवार (प्रथम/तिसरा), रविवार व इतर सार्वजनिक सुट्टया वगळून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दाखल करता येतील. अंतीम तारखेनंतर कोणतेही प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

महाराष्ट्र शासननिर्णय दि. १३/०९/२०१७ व वेळोवेळीचे शासन निर्णय व निर्देश, विद्यापीठ अनुदान आयोग ( विद्यापीठाकडून महाविद्यालयांना संलग्निकरण ) विनियम २००९ नुसार नमूद केलेल्या विनियमातील तरतूदी संस्थेने संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/तुकडी/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा इत्यादीसाठीची मागणी करण्यापूर्वी विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयात NAAC / NBA/ QCI, नियमीत प्राचार्यांची नियुक्ती, विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षक संख्या, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपलब्धता, आवश्यक अकृषक जमीन, विहीत क्षेत्रफळ असलेल्या प्रशासकीय, शैक्षणिक आणि ईतर इमारती, वीज, पाणी, स्वच्छतागृह इत्यादींची व्यवस्था, विनियमातील तरतूदीनुसार ग्रंथालय, प्रयोगशाळा, सभागृह, सुयोग्य फर्निचर, तासिकांसाठी खोल्यांची व्यवस्था, आर्थीक तरतुद, नॅक मुल्याकंन/पूनर्मुल्याकंन इत्यादी सर्व बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्यामुळे संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा/तुकडी यासाठी प्रस्ताव /आवेदनपत्र सादर करण्यापूर्वी संबंधीतानी या बाबत खातरजमा करून घ्यावी.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ नुसार संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/ तुकडी/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा यासाठी प्रस्तावाच्या अर्जाचा नमुना विद्यापीठ संकेतस्थळावरून प्राप्त करून **०३ (तीन)** प्रतिमध्ये आवश्यक प्रक्रिया शुल्कासह दाखल करावा. (शुल्क तक्ता संकेतस्थळावर उपलब्ध आहे.) संलग्निकरण शुल्क तक्त्यातील ७ नंबर क्रमांकामधील प्रक्रिया शुल्क (Processing Fees) + प्रस्ताव शुल्क रु.२०००/– प्रमाणे भरणा करावेत. हे शुल्क डी.डी. द्वारे किंवा NEFT/RTGS द्वारे वित्त व लेखाधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड IDBI बॅक, शाखा नांदेड, IFSC CODE- IBKL0000500 खाते क्रमांक ५०.०१०४०००००२८४२२ मार्फत स्विकारले जातील. याची नोंद घ्यावी. प्रस्तावासोबत परिशिष्ट 'ब' नुसार मुद्येनिहाय क्रमवार कागदपत्र जोडावीत त्यास अनु क्र. द्यावा व पताका लावावेत तसेच प्रस्तावासोबतच्या सर्व छायांकित पानांवर साक्षांकन असणे आवश्यक आहे.

संस्थेच्या प्राप्त प्रस्तावातील परिशिष्ट 'ब' नुसार छाननी समितीने पात्र केलेल्या प्रस्तावाकरिता पाहणी समिती पाठविण्यात येईल. सबब, वरील प्रमाणे सर्व संबंधीतानी नोंद घ्यावी.

सर्व संबंधीताना असेही कळविण्यात येते की, वरील प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने स्विकारणेसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी निर्देशीत केल्यास असे सर्व प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने भरुन सादर करण्याची जबाबदारी संबंधीत संस्था/महाविद्यालयाची असेल,याबाबतचे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे. सोबत हमीपत्राचा मसुदा जोडलेला आहे.

विद्यापीठ संकेतस्थळ : www.srtmun.ac.in

संदर्भ शैक्षणिक/संलग्न–०३/२०२४–२५/ 711

दिनांक :३०/०८/२०२४ 31

स्थळ : नांदेड

31/8/24

कुलसचिव